वाचले :- १) शासन निर्णय क्रमांक एल.एन.डी. १९७७१/८३७८३
दिनांक ९ सप्टेंबर १९७१ व सम क्रमांकाचे परिपत्रक
२५.२.१९७२.

२) मा. उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यां
पत्र क्रमांक -२०००-गावठाण-कावि-३८८ दिनांक २८.६

— ० —

क्रमांक-२०००-गावठाण-३६३
जिल्हाधिकारी कार्यालय नंदुरबार.
नंदुरबार दिनांक ३०.६.२०००.

आदेश

म० अध्यक्ष, आदिवासी, सेवा सहायक व शिक्षण प्रसारक संस्था नवापूर जि० नंदुरबार यांनी मौजे भरडू ता० नवापूर जि० नंदुरबार येथील, गांव वर्दळ ग.नं. ३ पैकी १ हेक्टर जमीन शैक्षणिक कामासाठी दिनांक २१.३.१९९८ च्या पत्रान्वये मागणी केलेली आहे. त्यानुसार तहसिलदार नवापूर यांनी प्रस्ताव सादर केला आहे.

मौजे भरडू ता. नवापूर येथील गांववर्दळ ग.नं.३ हे.३.२५ आर तसेच आहे. ग्राम पंचायत भरडू यांनी त्याकामी दि. २०.११.१९९६ च्या, ठराव क्र.५ अन्वये, म० अध्यक्ष, आदिवासी, सेवा सहायक व शिक्षण प्रसारक संस्था, नवापूर यांना आश्रम शाळेस करणे बाबत संमती दिलेली आहे. वरील संस्थेस शाळेच्या इमारती ०.७५ आर व क्रिडांगणासाठी ०.२५ आर जमिनीची मागणी केली त्याबाबत नकाशा, प्रस्तावीत पानांक ११ व १८३ वर सामील आहे.

ग्रामस्थ भरडू यांची त्याकामी संमती आहे. व प्रश्न क्षेत्र संस्थेस वितरण करणे बाबत, तहसिलदार नवापूर व उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांनी शिफारस केलेली आहे.

उपरोक्त विवेचनावरुन, मी जिल्हाधिकारी नंदुरबार महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीची विल्हेवाट) नियम १९७१ नियम ५ व ६ अन्वये भोगाधिकार, मूल्य रहित, व सारा माफीने, भरडू ता० नवापूर, येथील, गांववर्दळ ग.नं. ३ पैकी १ हेक्टर जमीन शैक्षणिक कामासाठी (शाळेची इमारत) म. अध्यक्ष आदिवासी सहायक व शिक्षण प्रसारक संस्था नवापूर यांना मंजूर करीत आ

उक्त जमीनी पैकी, (अ. नं. ३) क्रिडांगणासाठी लागणारे क्षेत्र, वरील नियमातील नियम ७ नुसार, प्रतिवर्षी नाम मात्र ६१/- आकारुन, १५ वर्षे भाडे पट्याने, मंजूर करीत आहे.

मजकूर संस्थेस वरील जमिन खालील शर्तीवर मंजूर करीत आहे.

१) संस्थेस महाराष्ट्र जमिन महसूल अधिनियम १९६६ व त्या खाली नियम बंधन कारक राहील.

२) संस्थेस ज्या कारणांसाठी, मंजूर केली आहे. त्या कारणांसाठी, संस्थेने तिचा उपयोग करावा. त्या व्यतिरिक्त अन्य कारणांसाठी सदर जमीन उपयोग करु नये.

३) संस्थेस लागणाऱ्या इमारतीसाठी, मंजूर झालेल्या जमीनीवर इमारतीचे बांधकाम, प्रस्तुत आदेशाच्या तारखेपासून, किंवा जमीनीचा ताबा पासून, दोन वर्षाच्या आत केले पाहिजे.

४) संस्थेस इमारत बांधणे पूर्वी, तिचा आराखडा, स्थानिक ग्राम पंचायत कडून मंजूर करुन घेवून, त्या प्रमाणे बांधकाम केले पाहिजे.

५) संस्थेस प्रस्तुत जमीन, नविन शर्तीने मंजूर केलेली असल्याने, सदर जमीनीचा, म. जिल्हाधिकारी, यांचे पूर्व परवानगी शिवाय पट्टा, गहाण, हस्तांतर, विक्री अगर तबदील करु नये.

६) मंजूर केलेल्या जमीनीवर संस्थेने आदेशाच्या तारखे पासून अगर ताबा घेतल्याच्या दिनांका पासून, दोन वर्षाच्या आत, दर चौरस मिटर १ या प्रमाणे झाडे लावावीत व त्यांची योग्य ती निगा राखावी.

७) संस्थेस मंजूर केलेल्या जमीनीची भविष्य काळात, शासनास गरज भासल्यास, सदर जमीन संस्थेस कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता अगर [illegible] बांधकाम खात्याने जमीनीवरील बांधकामाची निश्चित केलेल्या, किंमती इतकी, नुकसान भरपाई देवून जमीन, सरकार जमा करण्यात येईल.

८) संस्थेस महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीची विल्हेवाट) नियम १९७१ चे नियम ६ खालचे नमुना नं. १ मध्ये आलेल्या, इमारतीसाठी मंजूर केलेल्या जमीनीची व नियम ७ खालचे नमुना दे. मध्ये शेती क्रिडांगणासाठी भाडे पट्याने मंजूर केलेल्या जमीनीची प्रस्तुत आदेशाच्या तारखेपासून, दोन महिन्याचे आंत करुन दिले पाहिजे.

९) वरील पैकी, कोणत्याही एक शर्तीचा भंग झाल्यास संस्थेस व

( पा. ३ पहा ) →

करण्यांत आलेली जमीन, तिच्या वरील बांधकामासह, कोणत्याही प्रकारची नुकसान भरपाई न देता, सरकार जमा करण्यांत येईल.

स्वाक्षरी,

जिल्हाधिकारी नंदुरबार,

२९.६.

प्रति

म. अध्यक्ष, आदिवासी सेवा सहाय्यक व शिक्षण प्रसारक- नवापूर जि. नंदुरबार.

प्रतिलिपी :- म. उपविभागीय अधिकारी नंदुरबार भाग नंदुरबार यांचे माहिती साठी रवाना.

प्रतिलिपी :- मूळ कागदपत्रासह, तहसिलदार नवापूर यांचेकडे अ- मंजूर केलेल्या जमिनीचा ताबा, सनद करुन घेण्यात यावा व पूर्तता अहवाल सादर करावा.

स्वाक्षरी,

जिल्हाधिकारी नंदुरबार करिता

२९.६.